MD
3247

श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी
औषध भांडार (खरेदी) विभाग,
दि. २३/०१/२०१८

**टिप्पणी**

**विषय :- श्री साईनाथ रुग्णालयातील Ortho O.T. विभागाकरिता Electric Power Drill System खरेदीकामी कोटेशन मागणीपत्र संस्थानचे वेबसाईटवर प्रसिध्द करणे तसेच कोटेशन मागविणेबाबत ..**

**सेवेसी सादर,**

दि. २५/०७/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्र. ८४, निर्णय क्र. ६०४ अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णातील विविध मशिन्स् बदलेकामी उपरोक्त प्रस्तावास नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ६,९६,०१,६००/- इतक्या खर्चास मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त प्रस्तावाप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयातील Ortho O.T. या विभागाकरिता Electric Power Drill System खरेदीकामी ०१ नगासाठी अंदाजे रक्कम रु. १,५०,०००/- इतकी येत आहे. असे एकूण ०२ नगांसाठी अंदाजे खर्चाची रक्कम रु. ३,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. – तीन लाख मात्र) इतकी येत आहे.

**तथापि, शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४/प्र.क्र.८२/भाग – ३/उद्योग – ४, दि. ०१/१२/२०१६ अन्वये परिच्छेद ३.२.३ –** रु. ५ हजार ते रु.३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु. ३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु. ३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

त्यानुसार, श्री साईनाथ रुग्णालयातील Ortho O.T. विभागाकरिता Electric Power Drill System खरेदीकामी कोटेशन मागणीपत्र सादर केले असून, त्यावर स्वाक्षरी होणेस विनंती तसेच संस्थानचे www.sai.org.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यास मान्यता असावी, ही विनंती.

**(कुणाल आभाळे)**
परचेस मॅनेजर

२४-१-१८
**(डॉ. विजय नरोडे)**
उप वैद्यकीय संचालक

**(डॉ. पी. एम. मुरंबीकर)**
वैद्यकीय संचालक
तथा, जिल्हा शल्य चिकित्सक
श्री साईबाबा संस्थान रुग्णालये, शिर्डी